मौजे कुंडल ता.पलुस जि.सांगली येथे वनविभागाच्या अखत्यारीत नवीन वानिकी प्रशिक्षण विद्यालयासाठी पद निर्मिती या योजनेतील १५ अस्थायी पदांना सन २०१९-२० कालावधी करिता मुदतवाढ देणे बाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण -२०१९/प्र.क्र.११२/फ-९

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- १६ मार्च, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. असक-१००४/प्र.क्र.१२(भाग-२) २००८/ वित्तिय सुधारणा-१, दिनांक ४.१०.२००४

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.: एफडीएम २०१२/प्र.क्र.१०२/फ-२ दिनांक ०७.०२.२०१४

३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एफडीएम २०१२/प्र.क्र.१०२/फ-२ दिनांक १२.०२.२०१४

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.: एफडीएम २०१७/प्र.क्र.२३/फ-२, दिनांक १८.०१.२०१८

५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र ०८/१६/आ.पु.क., दिनांक २१.२.२०१९

६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-३/योजनेत्तर/प्र.क्र.४४/१८-१९/२१९३, दिनांक २८.२.२०१९

७) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एफडीएम-२०१८/प्र.क्र.३५/फ-२, दिनांक ३१ मार्च, २०१८

८) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३९३ /फ-९, दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१८.

शासन निर्णय :-

"मौजे कुंडल ता.पलुस जि.सांगली येथे वनविभागाच्या अखत्यारीत नवीन वानिकी प्रशिक्षण विद्यालयासाठी पद निर्मिती" या योजनेतील १५ अस्थायी पदांना सन २०१९-२० मध्ये दिनांक ०१.०३.२०१९ पासून दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत मुदत वाढ देण्याकरिता शासन विचाराधीन आहे.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील संदर्भ क्र.६ वरील दि.२८.२.२०१९ च्या पत्रासोबतचा प्रस्ताव विचारात घेता हया शासन निर्णयान्वये मंजूर आकृतीबंधात समाविष्ट नसलेल्या "कुंडल फॉरेस्ट ॲकॅडमी ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड मॅनेजमेंट(फॉरेस्ट) तथा "कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी(वने)" मधील खालील १५ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते ३०.०९.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

अक्र.	पदाचे नांव	संख्या
१	महासंचालक (मुख्य वनसंरक्षक)	१
२	संचालक (वनसंरक्षक)	१
३	प्राध्यापक (व्यवस्थापन व प्रशासन) (वनसंरक्षक)	१
४	प्राध्यापक (समाजशास्त्र, राज्यशास्त्र व मानसशास्त्र)	१
५	अपर संचालक (प्रशिक्षण) (विभागीय वन अधिकारी)	१
६	सहयोगी प्राध्यापक (अभियंता)	१
७	सहयोगी प्राध्यापक (संगणक)	१
८	प्रशिक्षण कार्यक्रम समन्वयक (वनक्षेत्रपाल)	१
९	कार्यालय अधिक्षक	१
१०	लघुलेखक (निम्न श्रेणी)	१
११	लेखापाल	१
१२	रोखपाल	१
१३	लिपिक	१
१४	दृकश्राव्य व्यवस्थापक	१
१५	क्रिडांगण सहायक	१
	एकूण	**१५**

या पदांवर होणारा खर्च हा -मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष २४१५ कृषी विषयक संशोधन व शिक्षण , ०६ वनीकरण, २७७ शिक्षण (००)(०२) कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल, ३१-सहायक अनुदाने, ३६-सहायक अनुदाने (२४१५ १०६८) वेतन या लेखाशीर्षा खाली दर्शविण्यात यावा व त्या खालील सन २०१९-२० यावर्षी मंजूर होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा. सदर कालावधी मध्ये त्यांच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेवून

सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या नंतर सुधारीत आकृतीबंध निश्चीत करण्याकरीता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही.

प्रस्तूत शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक-पदनि २०१६/ प्र.क्र.०८/ १६/आ.पु.क., दि. २१.२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१८११५१४४९११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJAYKUMAR VASUDEO PATIL

Digitally signed by VIJAYKUMAR VASUDEO PATIL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=b1fa488256513b9e2a5b0085040486cc2b67ff77bb697c031c8d3ba4aaf6e350, postalCode=400032, street=4 TH FLOOR,MANTRALAYA ANNEXURE BLDG,MADAM CAMA ROAD,MUMBAI,
serialNumber=1e8a52fc7907817fd27a6f930b32f785394ccf71e961f74377a96cf067b3d824, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIJAYKUMAR VASUDEO PATIL
Date: 2019.03.18 11:55:28 +05'30'

(वि.वा.पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
५. मुख्य वनसंरक्षक(प्रा.) कोल्हापूर/प्राचार्य, कुंडल व वनप्रशिक्षण संस्था, सांगली
६. मुख्य वनसंरक्षक तथा महसंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), मौजे कुंडल ता.पलूस, जि.सांगली
७. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर/सांगली.
९. नियोजन विभाग (कार्यासन १४५४), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१०. वित्त विभाग, व्यय १०/अर्थसं-४/वित्तिय सुधारणा, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. निवडनस्ती, फ-९ कार्यासन,म. व व.वि,.मंत्रालय,मुंबई-३२.